# विविधज्ञ कऱ्हाडे

**श्रीपाद दामोदर सप्रे. ९८१९८११३९१**

यादवांचे पंतप्रधान हेमाडपंत हे कऱ्हाडे होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजपुरोहित केशव पंडीत पुरोहित, बाजीराव पेशव्यांचे मंत्री गोविंदपंत खेर, शाहू महाराजांचे मंत्री चिमणाजी दामोदर मोघे, माधवराव पेशव्यांचे गुरू आणि सल्लागार महादजीपंत करकरे तसेच विसाजीपंत बिनिवाले-चिंचाळकर हे सर्व कऱ्हाडेच होते. मातीच्या ढेकळाला हात लावील तर त्याचे सोने करील आणि लाकडाच्या ओंडक्याला हात लावील तर त्याचे पोलाद बनवील अशी अद्भूत कियमागार, ब्रिटिशांचा दुटप्पीपणा वेशीवर टांगणारी पहिली भारतीय संस्थानिक, वैधव्यानंतर केशवपनासारखे निर्बंध दूर सारणारी स्वयंभू स्त्री कसलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांना युध्दनेतृत्वाने जेरीस आणणारी, असंख्य भारतीय क्रांतीकारकांची स्फूर्ती देवता - झाशीची राणी लक्ष्मीबाई ही कऱ्हाडेच होती. बंधुभगिनिंनो, किती नावे घ्यावीत ? हीच परंपरा पुढेही सुरू राहिली. भारताचे गृहमंत्री भारतरत्न पं. गोविंद वल्लभपंत पराडकर, पद्मविभूषण बाळासाहेब खेर जे त्यावेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. तसेच इंग्लंडमध्ये उच्च आयुक्तपदावर होते. बाळासाहेब खेर यांनी भारताची घटना तयार करताना आपले बहुमूल्य योगदान दिले होते. तसेच लोकसभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब मावळणकर. आजही प्रकाश जावडेवर, खासदार मधुकर सरपोतदार, आमदार नितीन सरदेसाई अशा अनेकांच्या रूपाने ही परंपरा सुरूच आहे.

न्यायदानाच्या पवित्र अशा क्षेत्रातही न्यायमूर्ती सरवटे, न्यायमूर्ती तुळजापूरकर, न्यायमूर्ती तांबे, न्यायमूर्ती देव, न्यायमूर्ती गोळवलकर, न्यायमूर्ती हर्डीकर, अशी असंख्य नावे आपल्याला दिसतील. याच निस्पृहतेने आणि निडरपणे कर्नल अनिल आठ्यले, वीरचक्र पुरस्कार प्राप्त अरूण देऊस्कर, रिअर ॲडमिरल सुदर्शन श्रीखंडे असे अनेक लोक आज सैन्यदलात राहून भारतभूमीची सेवा करताना दिसतात. देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या मंडळींबरोबरच देशाच्या अंतर्गत सुरक्षेची काळजी वहाणारे ॲडीशनल डायरेक्टर जनरल ऑफ पोलिस श्री. जयंत उमराणीकर, जॉईंट कमिशनर हेमंत करकरे, असिस्टंट कमिशनर राजन काटदरे, ॲडीशनल कमिशनर विवेक फणसळकर अशा अनेकांनी योगदान आणि बलिदान दिलेले आहे.

बंधु आणि भगिनिंनो, व्यवसायाच्या बाबतीतही आपण मागे नाही. पद्मभूषण शंतनुराव किर्लोस्कर आणि पुढे त्यांच्या कुटुंबीयांनी अनेक कंपन्यांचे जाळे निर्माण केले. विको वज्रदंतीचे गजाननराव पेंढारकर, धूतपापेश्वरचे रणजित पुराणिक, पितांबरीचे रवींद्र प्रभुदेसाई, लिम्का रेकॉर्ड पुस्तकात नोंद झालेले शरदचंद्र सरवटे, सांडू ब्रदर्स, व्यायामशाळेचे जाळे तयार करणारे तळवळकर बंधू, लोणची आणि मसाल्याचे व्यापारी ठाकूर बंधू असे अनेक कऱ्हाडे व्यावसायिक आज आपल्याला दिसतात. कऱ्हाड्यांना जन्मजात चवीचे ज्ञान असते असे म्हणतात त्यामुळे खाद्य संस्कृती जपणारे पणशीकर, तांबे, सरपोतदार, पातकर आणि गावोगावी -इतर शहरातून लहान मोठी हॉटेल्स चालवणारे असंख्य कऱ्हाडे हेच सिध्द करतात की चवीने खाणार त्याला कऱ्हाडे देणार.

जी गोष्ट व्यवसायाची तीच गोष्ट आस्थापनांमधल्या उच्च पदांची. कऱ्हाडे बांधव अनेक कंपन्यांमध्ये अधिकारपदे भूषवीत होते आणि

(क्रमश:)


सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!




कोंकण काजू

उत्पादक :

कोंकण काजू सांडगी मिरची

फणस-तळलेले गरे काजूकतली

प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर

मु. पो. - आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१


## हरवला आहे

अजिंक्य दि. २० जुलै २००९ पासून आकुर्डी स्टेशन येथून घरी येण्यास निघाला असता स्टेशनवरून बेपत्ता आहे. तो पिंपरी चिंचवड इंजीनिअरींग कॉलेज येथे प्रवेशयादी पहावयास गेला होता.

कोणालाही आढळल्यास संपर्क
श्री. अभय द. किराणे
९५५२५२०३६२
सौ. मंजुश्री अ. किराणे
९५५२५३०३१६
सौ. तृप्ती उपाध्ये
९५५२५३०२२६
सौ. भक्ती देशमुख
९४२२२०८९९१



**चि. अजिंक्य अभय किराणे**